**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक : ६६०/२०१२
सुनावणी दिनांक : २०/०६/२०१३
निर्णय दिनांक : २०/०६/२०१३

१ श्री. दिलीप तुकाराम निकम, अपिलार्थी: उपस्थित
मौनगिरी नगर, हिरावाडी रोड,
जाधव हॉस्पीटलच्या मागे, पंचवटी,
नाशिक.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी : उपस्थित
ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत कुंझर, ता. चाळीसगांव,
जि. जळगांव.

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी : उपस्थित
गट विकास अधिकारी, पंचायत समिती
चाळीसगांव, ता. चाळीसगांव, जि. जळगांव.

## निर्णय

अपिलकर्ता यांनी दिनांक १८/०२/२०१२ रोजी राज्य माहिती आयुक्त, नाशिक यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये सदरचे द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यासाठी अपिलकर्ता व उत्तरवादी यांना नाशिक आयोगाच्या कार्यालयातून दिनांक ३१/०५/२०१३ रोजी नोटीस काढून दिनांक २०/०६/२०१३ रोजी अपिलाच्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. सदरची सुनावणी आज दिनांक २०/०६/२०१३ रोजी घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हजर आहेत त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक श्री. अरुण रंगराव देशमुख हजर आहेत तसेच

प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चाळीसगांव सौ. मालती एम. जाधव हजर आहेत.

अपिलकर्ता यांनी आयोगापूढे नमूद केले की, त्यांनी दिनांक १४/०९/२०११ रोजी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक कुंझर, ता. चाळीसगांव यांच्याकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन ग्रामपंचायत कुंझर येथील घर नं. ४२५ अ. नं. ४९५ या मिळकतीबाबत माहिती मागितली होती. परंतु त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून ३० दिवसांच्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील गट विकासअधिकारी, पंचायत समिती, चाळीसगांव यांच्याकडे दाखल केले. परंतु प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाची सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नाही. मात्र त्यानंतर त्यांना दिनांक १६/०१/२०१२ रोजी रजिस्टर पोस्टाने पाकीट मिळाले परंतु त्यामध्ये कोणतीही माहिती त्यांना मिळाली नाही. म्हणून जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या विरुध्द शास्तीची कार्यवाही करावी असे त्यांनी नमूद केले.

आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक कुंझर श्री. अरुण देशमुख यांनी आयोगापूढे नमूद केले की, अपिलकर्त्याचा दिनांक १४/०९/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दिनांक १६/०९/२०११ रोजी प्राप्त झाला होता. सदरच्या माहितीच्या अर्जात अपिलकर्त्याने वर नमूद केल्याप्रमाणे मिळकतीची माहिती मागितली होती. परंतु दरम्यानच्या काळात त्यांचा अपघात झाल्यामुळे अपिलकर्त्यास ३० दिवसांत माहिती देता आली नाही. तथापि त्यानंतर दिनांक ११/०१/२०१२ रोजी रजिस्टर पोस्टाने अपिलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिली. सदरचे रजिस्टर पाकीट अपिलकर्त्यास दिनांक १६/०१/२०१२ रोजी प्राप्त झाले परंतु सदरच्या रजिस्टर पाकीटामध्ये कोणतीही माहिती नव्हती असे अपिलकर्त्याचे म्हणणे आहे.

म्हणून प्रस्तुत प्रकरणात असे दिसून येते की, अपिलकर्ता यांचा दिनांक १४/०९/२०११ चा माहितीचा अर्ज दिनांक १६/०९/२०११ रोजी ग्रामसेवक श्री. अरुण देशमुख यांच्याकडे प्राप्त झाला होता. परंतु त्यानंतर त्यांचा अपघात झाल्यामुळे ग्रामसेवक पदाचा पदभार श्री. अ. एम. राठोड

यांच्याकडे होता. परंतु त्यांनी अपिलकर्त्यास ३० दिवसांत माहिती दिली नाही म्हणून त्यांचा याबाबत खुलासा मागविणे आवश्यक आहे. तसेच त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्त्यास दिनांक ११/०१/२०१२ रोजी रजिस्टर पोस्टाने माहिती पाठविली परंतु सदरच्या पाकीटामध्ये माहिती नाही असे अपिलकर्त्याचे म्हणणे आहे म्हणून अपिलकर्त्यास पुन्हा सदरची माहिती विनामूल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपिलकर्ता यांचे अपील क्र. ६६०/२०१२ अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक श्री. अरुण देशमुख यांनी अपिलकर्त्यास पुन्हा दिनांक १४/०९/२०११ च्या माहितीच्या अर्जाची संपूर्ण माहिती विनामूल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२. प्रस्तुत प्रकरणात तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री. अे. एम. राठोड यांच्याकडे ग्रामसेवक पदाचा कार्यभार होता परंतु त्यांनी अपिलकर्त्यास ३० दिवसांच्या मुदतीत माहिती दिलेली नाही म्हणून त्यांच्या विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करु नये याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत सादर करावा.

३. सदरच्या निर्णयाची एक प्रत विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री. अे. एम. राठोड यांच्याकडे खुलासा करण्यासाठी पाठवावी व त्यांची पोहच त्यांच्याकडे प्राप्त करुन घ्यावी.

**नाशिक**
**दिनांक** २०/०६/२०१३

**( पी. डब्ल्यू. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ नाशिक**

Com.३/D/June. १३/vgs

प्रत,

१ श्री. दिलीप तुकाराम निकम, मौनगिरी नगर, हिरावाडी रोड, जाधव हॉस्पीटलच्या मागे, पंचवटी, नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कुंझर, ता. चाळीसगांव, जि. जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती चाळीसगांव, ता. चाळीसगांव, जि. जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक